RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष १२, अंक ५१(४)] गुरुवार, जुलै २३, २०२६/श्रावण १, शके १९४८ [पृष्ठ ३, किंमत : रुपये ४.००

असाधारण क्रमांक १२२

प्राधिकृत प्रकाशन

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

अधिसूचना

विशेष कार्यकारी अधिकारी यांची नेमणूक

शासन निर्णय क्रमांक

(१) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. विकाअ-११२५/प्र. क्र. -०५, दिनांक ०३/०२/२०२५

(२) इकडील आदेश क्र. कार्यासन ७/गृह-१/आरआर/१२२६/२०२६, दिनांक - ०८/०७/२०२६.

क्र. कार्या-७/गृह-१/आरआर/१२२६/२०२६.– मी, डॉ. विजय राठोड, भा. प्र. से., जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर, शासन निर्णयाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाली नमूद अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तींची गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त असलेने विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. सदर पुरस्कार प्राप्त व्यक्तीची विशेष कार्यकारी अधिकारी पदावरील ही नियुक्ती त्यांच्या **वयाच्या ६५ वर्षापर्यंत अस्तित्वात** राहील, पोलीस पडताळणी अहवाल नकारात्मक प्राप्त झाल्यास नियुक्ती तात्काळ रद केली जाईल. विशेष कार्यकारी अधिकारी यांची नियुक्ती विहित कालावधीनंतर आपोआप संपुष्टात येईल. नियुक्तीच्या कालावधीत कोणतीही बेकायदेशीर कृती केल्यास किंवा त्याचेविरुध्द गंभीर गुन्ह्याची नोंद आढळल्यास किंवा शिक्षा झाल्यास किंवा त्यास नादार म्हणून जाहीर केले असल्यास किंवा कोणत्याही कारणाशिवाय कोणतीही पूर्वसूचना न देता अशी नियुक्ती, मुदतपूर्व रद्द करण्याचे अधिकार मला राहील व तो पुनर्नियुक्तीस पात्र ठरणार नाही. विहित मुदत कालावधी संपुष्टात आलेवर किंवा त्यापुर्वीच संपुष्टात आणण्यात आल्यास विशेष कार्यकारी अधिकारी पदासाठी प्राप्त झालेले सर्व साहित्य संबंधित पोलीस ठाणे किंवा जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयामध्ये तात्काळ परत करण्याची प्राथमिक जबाबदारी सर्वस्वी संबंधित विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांची राहील.

विशेष कार्यकारी अधिकारी हे खालील **अधिकार व कर्तव्ये** पार पाडण्यासाठी सक्षम राहतील :—

१. विशेष कार्यकारी अधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रातील नागरिकांचे शासकीय कामासाठी आवश्यकतेनुसार ओळखीचे व रहिवासाचे प्रमाणपत्र देता येईल.

२. वारंवार येणारा दुष्काळ, पूर, चक्रीवादळे आणि भूकंपासारख्या आपत्तीमुळे होणारी जीवितहानी, कोणतीही आकस्मित घटना जिच्यामुळे होणारी जीवित हानी, स्थावर मालमत्तेचे नुकसान, पुरात/नदीत वाहून गेलेले इत्यादीकरिता शोध व बचाव पथकास "आपदा मित्रास" तसेच स्थानिक पातळीवर महसूल, पोलीस, होमगार्ड, अग्निशमन, आरोग्य, शिक्षण व आपत्ती व्यवस्थापन इत्यादी विभागातील अधिकारी/कर्मचारी व इतर अशासकीय सदस्यांना पंचनामे तसेच इतर कार्य करणेस मदत करणे.

३. ग्रामीण भागात चोरी, शांततेचा भंग आणि जनतेस व गावातील समाजास हानी पोहचविण्याचे कृत्य तसेच सण उत्सवाच्या काळात अनुचित प्रकार घडू नये व सुरक्षेच्या दृष्टीकोनातून पोलीस विभागाला मदत करणे.

४. शासनाच्या विविध योजनांचा प्रचार व प्रसार करणाऱ्या ग्रामस्तरीय अधिकारी, नगरपालिका व महानगरपालिका स्तरावरील अधिकारी यांना आवश्यक ते सहकार्य करणे.

५. निवडणुकीचे कामात मृत मतदारांची नावे, घर सोडून गेलेल्या व इतर कारणामुळे कमी झालेल्या मतदारांची माहिती निवडणूक विभागात देण्याकरीता मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना मदत करणे.

६. आपले सेवा केंद्र, महा ई-सेवा केंद/आधार केंद्रावर विविध कागदपत्रांकरिता नागरिकांना आवश्यक ते सहकार्य करणे.

७. शिक्षण, आरोग्य , पर्यावरण, स्वच्छता, कृषि, पशुसंवर्धन इ. विषयाबाबत नागरिकांना आवश्यक ते सहकार्य करणे.

८. हुंडा, व्यसनाधीनता, बालमजुरी, बालविवाह, वेठबिगारी प्रथा संपविण्यासाठी शासनास सहकार्य करणे.

९. महिला, मुले व वृध्दांचे सुरक्षेसाठी शासनाचे अधिकारी यांना सहकार्य करणे.

१०. प्रदूषण नियंत्रणासाठी व वाहतुकीचे नियमन करण्यासाठी शासनास सहकार्य करणे.

११. पोलीसांकडून दाखल करण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या गुन्ह्याच्या तपासामध्ये कराव्या लागणाऱ्या विविध पंचनाम्यांमध्ये पंच म्हणून काम करणे.

१२. समाजामध्ये एकोपा तसेच सलोख्याचे व सुरक्षित वातावरण राहावे याकरिता पोलीस विभागाच्या कामामध्ये आवश्यक ते सहकार्य करणे.

१३. शासनाचे विविध सर्वेक्षणे, जनगणना, मोहिमा, अभियान यामध्ये संबंधित विभागाला आवश्यक ती मदत करणे.

विशेष कार्यकारी अधिकारी हे खालील **सर्वसाधारण तरतुदी** पार पाडण्यासाठी सक्षम राहतीलः-

१. विशेष कार्यकारी अधिकारी हे ग्रामसभेमध्ये विशेष निमंत्रित सदस्य असतील.

२. विशेष कार्यकारी अधिकारी हे राष्ट्रीय सण व उत्सवामध्ये ग्राम पातळीवर विशेष निमंत्रित सदस्य असतील.

३. विशेष कार्यकारी अधिकारी यांना राज्य शासनाच्या तालुकास्तरीय विभागात/ कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांच्या भेटीकरिता प्राधान्य असेल.

४. विशेष कार्यकारी अधिकारी हे ग्रामस्तरीय दक्षता समितीमध्ये निमंत्रित सदस्य असतील.

५. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती **"मानसेवी"** असल्यामुळे विशेष कार्यकारी अधिकाऱ्याला कोणतेही मानधन अथवा वेतन/भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

६. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तींनी त्यांच्या घरावर / दुकानावर / कार्यालयावर स्वतःच्या नावासह "विशेष कार्यकारी अधिकारी" असा फलक लावावा त्यांच्या नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यावर लागलीच फलक काढावेत. तथापि, त्यांनी त्यांच्या कुठल्याही वाहनांवर "विशेष कार्यकारी अधिकारी" असा उल्लेख करू नये.

७. कोणत्याही शासकीय/निमशासकीय/बँक/महामंडळ/स्थानिक स्वराज्य संस्था इ. आस्थापनांमधील कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येणार नाही.

८. एकाच कुटुंबातील एकापेक्षा अधिक व्यक्तीची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येणार नाही.

अनुसूची

अ. क्र.	विशेष कार्यकारी अधिकारी पदी नियुक्त व्यक्तीचे नाव	पत्ता	वय	शिक्षण	नोंदणी क्रमांक
१	उदय बाळासो कोरे	रा. मु.पो. रेंदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर	४२	१२ वी	२०२६/३५/६५१५६०००४३१८/१

कोल्हापूर,
दिनांक १४ जुलै २०२६.

डॉ. विजय राठोड, भा.प्र.से.
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.